**११) न. र. फाटक म्हणतात,** "स्वातंत्र्याच्या कल्पनेविषयी भारतीयांना निश्चित ज्ञान नव्हते. भारतात राष्ट्र उदयास यावयाचे होते. तेव्हा राष्ट्रीय व स्वातंत्र्य हे दोन्ही शब्द बाद होतात. फक्त युध्द शब्द शिल्लक राहतो."

**१८५७ या उठाव हे स्वातंत्र्यायुद्ध होते हे मत मांडणाऱ्या इतिहासकारांची मते -**

**१) वि. दा. सावरकर -** यांनी १९०७ साली १८५७ च्या उठावाची अर्धशताब्दी उत्सवप्रसंगी '१८५७ चे स्वातंत्र्य समर' हा ग्रंथ लिहिला व त्यात त्यांनी 'भारतीयांचा पहिला सशस्त्र राष्ट्रीय स्वातंत्र्यसंग्राम' असे म्हटले. या उठावास इतिहासकारांनी 'बंड' (Revolt) म्हटल्याबद्दल सावरकरांनी दु:ख व्यक्त केले होते.

**२) पंडित नेहरू यांच्या मते,** हे केवळ शिपायाचे बंड नव्हते. भारतात त्याचा फैलाव अतिशय झपाट्याने झाला. थोड्याच काळात त्याने लोकयुद्धाचे (People War) स्वरूप धारंण केले होते. हे मत नेहरूंनी 'भारताचा शोध' या ग्रंथात मांडले आहे.

**३) अशोक मेहता** यांनी `The Great Rebliion' या ग्रंथात म्हटले आहे, "१८५७ चे बंड हे शिपायांच्या बंडाहून अधिक होते. शिपायांना आपल्या मायभूमीच्या पारतंत्र्याची सतत दु:खद जाणीव होती. शिपायांशिवाय लक्षावधी लोकांनी या बंडात भाग घेतला होता. शिपायांइतकीच प्रजाजनाची हत्या झाली. हे बंड मर्यादित प्रमाणात का होईना पण राष्ट्रीय उठावाच्या स्वरूपाचे होते."

**४) इंग्लंडचा पंतप्रधान डिझरायलीच्या मते,** "हा एक महान संग्राम होता. काडतुसासारख्या शुल्लक गोष्टीमुळे अशा महान क्रांतीचा जन्म होऊ शकत नाही."

**५) सुभाषचंद्र बोस** यांनी या युद्धाचे वर्णन 'राष्ट्रीय क्रांती' या शब्दात केले आहे.

**६) डॉ. एस. एन. सेन यानी '१८५७'** या ग्रंथात या उठावास 'राष्ट्रीय युद्ध' म्हटले आहे. त्यासंबंधीचा युक्तिवादही त्यांनी मांडला आहे. डॉ. सेन म्हणतात, "संघर्षाला प्रारंभ सैनिक विद्रोहापासून झाला. त्यात सर्व भारतीय सहभागी नव्हते. मीरतच्या सैनिकांनी उठाव करून दिल्ली काबीज केली व बहादुरशहाला दिल्लीचा सम्राट घोषित केले तेव्हाच हा संघर्ष राजकीय बनला."

मीरतचे अनुकरण इतरांनीही केले आणि तेव्हापासून संघर्ष 'राष्ट्रीय युद्ध' बनला. इंग्रज शासन बदलून त्या जागी पुन्हा मोगल घराण्याची राजवट प्रस्थापित करणे हे क्रांतीकारकांचे ध्येय बनले. हा बदल अर्थातच क्रांतिकारक होता. म्हणूनच संघर्षाचे शक्तिक्षेत्र व व्याप्ती सीमित असली तरी ते स्वातंत्र्ययुद्ध होते."

Scanned with OKEN Scanner

आउट्राम या ब्रिटिश सेनापतीने "हा उठाव म्हणजे हिंदू-मुसलमानांनी ब्रिटिश सत्तेचे उच्चाटन करण्यासाठी आपसात केलेला एक कट होता" असे म्हटले आहे. पण हे मत वस्तुस्थिती व पुराव्यावर टिकत नाही. कारण राष्ट्रीय शासन प्रस्थापित करण्यासाठी राष्ट्र ही कल्पना अस्तित्वात यावी लागते. डॉ. सेन व डॉ. आर.सी. मुजुमदार यांनी त्या काळात 'भारतीय राष्ट्र' ही कल्पनाच अस्तित्वात नव्हती असे म्हटले आहे. उलट हिंदू-मुस्लिम यांच्यात ऐक्य असले तरी त्यांची ध्येये भिन्न होती. मुस्लिमांना बहादुरशहाच्या नेतृत्वाखाली मुस्लिम सत्तेचे पुनरुज्जीवन करावयाचे होते, तर नानासाहेबांना पेशवाईचे पुनरुज्जीवन करावयाचे होते. रजपुतांना मराठ्यांबद्दल तिरस्कार वाटत होता. त्यांना पेशवाई नको होती. तेव्हा हिंदू-मुसलमानांची ध्येये परस्पर भिन्न असल्याने ते ब्रिटिश सरकारविरोधी पूर्वनियोजित कट करतील असे वाटत नाही. त्यामुळे प्रस्तुत मत हे निराधार व चुकीचे वाटते.

१८५७ च्या उठावाच्या स्वरूपाबाबत प्रस्तुत नमूद जे तीन युक्तिवाद आहेत ते सर्वच एकांगी स्वरूपाचे आहेत. या उठावास निव्वळ शिपायांचे बंड म्हणणे १००टक्के खरे नाही तसेच हा उठाव १०० टक्के राष्ट्रीय लढा होता हे म्हणणेही बरोबर नाही.

**१८५७ च्या उठावाची कारणे -**

१८५७ च्या उठावाच्या स्वरूपाबाबत इतिहासकारांत मतभेद आहेत. तथापि या उठावाची कारणे व परिणाम याबाबत फारसे दुमत नाही. या उठावास जी कारणे कारणीभूत होती ती राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, प्रशासकीय व लष्करी स्वरूपाची होती. हिंदुस्थानातील परिस्थिती ही सर्व दृष्टीने स्फोटक झाली होती हे कॅनिंगच्या पुढील उद्‌गारावरून दिसते. तो म्हणतो, "हिंदुस्थानातील माझी कारकीर्द शांततेची व्हावी अशी माझी इच्छा आहे. तथापि तेथील स्वच्छ आकाशामध्ये तळहाताएवढा लहानसा ढग उत्पन्न होऊन तो एकाएकी सर्व आकाशमंडळ व्यापून टाकील आणि एकदम फुटून जाऊन आपल्या वर्षावाने आमची दुर्दशा करून सोडील हे मला लक्षात

ठेवले पाहिजे." परंतु काळजी घेऊनही लॉर्ड कॅनिंग म्हणजेच ब्रिटिशांना जे नको होते तेच खरे झाले व १८५७ चा उठाव कॅनिंगच्याच काळात झाला. हा उठाव कोणत्याही एका विशिष्ट कारणामुळे झाला नव्हता तर विविध कारणे त्यास कारणीभूत होती.

१) **राजकीय कारणे** - १६०० साली ईस्ट इंडिया कंपनी ही व्यापार करण्याच्या निमित्ताने भारतात आली; पण तिने व्यापार करत करत भारतातील राजकारणात विशेषत: औरंगजेबाच्या मृत्यूनंतर (इ.स.१७०७) लक्ष घालण्यास प्रारंभ केला. प्रारंभी इंग्रज व फ्रेंच यांच्यात कर्नाटकाची तीन युद्धे होऊन त्यांत फ्रेंच पराभूत झाले. १७५७ च्या प्लासीच्या युद्धाने भारतात ब्रिटिशांच्या सत्तेचे बंगाल प्रांतात बीजारोपण झाले. त्यानंतर औंधचा नवाब सिराजउद्दौला, बंगालचा नवाब मीर कासीम व दिल्लीचा बादशहा शहाआलम यांनी एकसंध बनवून इंग्रजांना बंगालमधून हाकलून देण्याचे ठरविले. परंतु १७६४ साली बक्सारच्या युद्धात या तिघांचाही पराभव झाला. परिणामी बंगालमध्ये ब्रिटिश सत्तेचा पाया मजबूत झाला. बंगालची सत्ता गमवावी लागल्याने तेथील शासक ब्रिटिश राज्यकर्त्यांवर नाराज झाला.

२) मराठे ही दक्षिणेतील एक मोठी शक्ती होती. पानिपतच्या तिसऱ्या युद्धात जरी मराठे पराभूत झाले असले तरी माधवराव पेशव्यांनी मराठी राज्यास पुन्हा प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. पण मराठेशाही अंतर्गत दुही, कलह, गटबाजी व सरदारांचा स्वार्थ यामुळे ती पोखरली गेली होती. इंग्रज व मराठे यांच्यात ३ युद्धे झाली.

१) पहिले इंग्रज-मराठा युद्ध १७७५-१७८१.
२) दुसरे इंग्रज-मराठा युद्ध १७९९-१८०२.
३) तिसरे इंग्रज-मराठा युद्ध १८१७-१८१८.

१८१८ साली पेशवाईचे समूळ उच्चाटन झाले. पेशवाईच्या ताब्याखालील प्रदेश ब्रिटिशांच्या अधिपत्याखाली गेला. मराठी सरदारांनाही त्यांच्या अधिपत्याखालील मोठमोठे प्रदेश ब्रिटिशांना द्यावे लागले. त्यामुळे नानासाहेब पेशवा व मराठा सरदार मंडळी ब्रिटिशांवर नाराज होती. नानासाहेब पेशवा हा कानपूरजवळ विठूर येथे नजरकैदेत होता.

३) इ. स. १८४३ मध्ये सिंधमध्ये फौज पाठवून कंपनीने तो प्रदेश आपल्या साम्राज्याला जोडला, तर १८४९ मध्ये पंजाबमध्ये रणजीतसिंगाच्या मृत्यूमुळे निर्माण झालेल्या अराजकतेचा फायदा देऊन दोन मोहिमा काढून पंजाब जिंकला.

४) लॉर्ड वेलस्लीने तैनाती फौज पद्धत अमलात आणून अनेक भारतीय राज्यांचे प्रदेश मिळवले व ते ब्रिटिशांच्या साम्राज्यास जोडले. तैनाती फौज लादून अनेक राज्ये ब्रिटिशांनी आपल्या नियंत्रणाखाली आणली.

Scanned with OKEN Scanner

५) लॉर्ड डलहौसीचे संस्थाने खालसा करण्याचे धोरण- १८४८-५६ या काळात भारतात लॉर्ड डलहौसी हा ग. ज. होता. त्याच्याच राजवटीत भारतात ब्रिटिशांचे साम्राज्यविस्ताराचे धोरण पूर्णत्वास नेले. त्याने खालील कारणे सांगून संस्थाने खालसा करण्याचे धोरण आखले.

१) दत्तक वारस नामंजूर करणे.

२) संस्थानात गोंधळ, अस्थिरता व अकार्यक्षमता आहे.

या तत्त्वानुसार सातारा, झाशी, नागपूर, औंध ही मोटमोठी संस्थाने डलहौसीने खालसा केली तसेच संबळपूर, जैतपूर भगत व उदयपूर ही संस्थानेही खालसा केली गेली. तैनाती फौजेची बाकी वसूल करण्याचे निमित्त करून डलहौसीने हैदराबादच्या निझामाकडून वऱ्हाड हा प्रांत घेतला (१८५३).

**६) पदव्या, जहागिऱ्या, तनखे बंद केले** - लॉर्ड डलहौसीने राजेरजवाडे यांना ब्रिटिशांनी दिलेल्या पदव्या, जहागिऱ्या व तनखे बंद केले. उदा. १८५२ साली दुसऱ्या बाजीराव पेशव्याचा दत्तकपुत्र नानासाहेब याचा वारसा हक्क नामंजूर केला व त्याची वार्षिक ८ लाखांची पेन्शनही बंद केली. 'पेशवा' ही नाममात्र पदवीही काढून घेतली. १८५५ साली तंजावरचा राजा सरफोजी मृत्यू पावला तेव्हा त्याच्या वारसदाराची जहागीर व तनखा डलहौसीने जप्त केला. दिल्लीचा मोगल बादशहा बहादुरशहा जाफर याच्यावरही हीच कारवाई केली. त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या वारसांना मोगल सम्राटाच्या राजवाड्यात राहता येणार नाही असे स्पष्ट बजावले होते. मोगल सम्राटाचे महत्त्व ब्रिटाशांनी साफ धुळीस मिळवले होते.

लॉर्ड नेपिअर हा इंग्रज सेनापती म्हणतो की, "मी जर का १२ वर्षांसाठी हिंदुस्थानचा बादशहा झालो तर हिंदुस्थानात एकही संस्थानिक नावाला राहणार नाही. हैदराबादचा निझाम इतिहासजमा होईल व नेपाळ इंग्रजांचे बनेल. अधिकाऱ्याच्या अशा बोलण्याने राज्यकर्ते भयभीत व नाराज झाले होते.

**२) सामाजिक कारणे -**

**१) ब्रिटिशांची वंशश्रेष्ठत्वाची भावना** - काळ्या लोकांपेक्षा गौरवर्णीय जन्मत: श्रेष्ठ आहेत अशी एक भावना १९ व्या शतकात युरोपात होती. इंग्लंडमधील लोक त्यास अपवाद नव्हते. मागासलेल्या जंगली लोकांना सुधारण्याचे एक पवित्र कार्य पार पाडण्याची जबाबदारी परमेश्वरानेच त्यांच्यावर (गोऱ्या लोकांवर) टाकलेली आहे असे ते समजत. इंग्रज भारतीयांपेक्षा श्रेष्ठ वंशाचे आहेत ही कल्पना भारतीय जनतेच्या मनात इतक्या पक्केपणाने रुजविली गेली की, त्यामुळे भारतीयांचा आत्मविश्वासच नष्ट झाला. युरोपियनांच्या हॉटेलमध्ये, क्लबमध्ये भारतीयांना काळे म्हणून प्रवेश नव्हता.

Scanned with OKEN Scanner

'भारतीयांना व कुत्र्यांना प्रवेश नाही' अशा पाट्याच तेथे लावल्या जात .या वर्णभेदाचे तडाखे पं. ईश्वरचंद्र विद्यासागर, मं. गांधी या थोर पुढाऱ्यांनाही सहन करावे लागले. या धोरणामुळे ब्रिटिशांविषयी द्वेषभावना निर्माण झाली होती.

**त्याशिवाय वंशश्रेष्ठत्वाबाबत खालील नियम होते.**

१) पायी जाणाऱ्या इंग्रज माणसाला घोडागाडीतून जाणाऱ्या भारतीय माणसाने खाली उतरून त्यास नम्रपणे सलाम करावा.

२) रेल्वेच्या प्रथम श्रेणीच्या डब्यात भारतीयांना प्रवेश नव्हता.

३) इंग्रज माणसाकडून हिंदी माणसाचा खून झाला असेल तर त्या गुन्ह्यासाठी त्या इंग्रज आरोपीने फक्त २ पौंड दंड भरावा असा नियम होता.

४) प्लासीच्या लढाईला १०० वर्षे पूर्ण झाली होती. तेव्हा आता ब्रिटिशांचे राज्य नष्ट होणार, ब्रिटिशांची शंभरी ब्रिटिशांना आता त्यांच्या पापाचे फळ भोगावे लागणार अशी एक चर्चा समाजात सुरू होती. त्यामुळे भारतीयांची मानसिकता बदलली.

५) ब्रिटिशांनी भारतीयांच्या जीवनात बदल करणारे काही कायदे पास केले होते. उदा. सतीबंदीचा कायदा, बालविवाह प्रतिबंधक कायदा, विधवा पुनर्विवाह संमती कायदा, कन्यावध बंदी कायदा वगैरे. परंतु हे कायदे पास केल्यामुळे भारतीयांच्या भावना दुखावल्या गेल्या. ब्रिटिश लोक आपल्या सामाजिक जीवनात हस्तक्षेप करीत आहेत असे भारतीयांना वाटू लागले. वास्तविक या कायद्यामागे भारतीय लोकांचे हित होते.

४) ब्रिटिशांनी भारतात रेल्वे आणली (१८५३). रेल्वेमार्गाचे जाळे विणले गेले. आगगाडीतून विविध जातीचे लोक प्रवास करू लागले. त्यामुळे ब्रिटिशांना भारतातील जातिव्यवस्था व अस्पृश्यता नष्ट करावयाची आहे असा एक समज निर्माण झाला.

५) ब्रिटिशांनी सुरू केलेले दवाखाने, शाळा या धर्मांतरासाठीच सुरू केल्या आहेत असे भारतीयांना वाटत होते.

**३) धार्मिक कारणे -**

**१) ख्रिश्चन धर्माच्या प्रसार** - ब्रिटिश राजवटीत ख्रिश्चन धर्माच्या प्रसाराचे कार्य व्यवस्थित सुरू होते. ख्रिश्चन धर्म स्वीकारला तरी त्या व्यक्तीचा इस्टेटीवरचा हक्क कायम राहील अशी सोय कायद्यात करण्यात आली. ख्रिश्चन मिशनच्या व त्यांचे धर्मप्रचारक हिंदू धर्म व संस्कृतीची निंदानालस्ती करीत. त्यामुळे हिंदू धर्म बुडतो की काय अशी स्थिती निर्माण झाली होती. रेल्वे, पोस्ट या सुधारणा भारतात करण्यामागचा

Scanned with OKEN Scanner

हेतू ख्रिश्चन धर्माचा प्रसार करणे हा आहे असे भारतीयांना वाटत होते. लॉर्ड मेकॉलेने त्याच्या आईस लिहिलेल्या पत्रात म्हटले होते, "३० वर्षात बंगालमध्ये एकही मूर्तिपूजक शिल्लक राहणार नाही." मॅगलीन हा कंपनीचा संचालक म्हणे, "ईश्वरानेच ख्रिश्चन धर्माच्या प्रसारासाठी हिंदुस्थानचे राज्य इंग्लंडच्या हाती सोपविले आहे."

२) धर्मांतर केलेल्या व्यक्तीला वडिलोपार्जित संपत्तीचा हक्क मिळत नसे. ब्रिटिशांनी १८५६ मध्ये कायदा करून तो अडसर दूर केला.

३) ब्रिटिशांनी इनाम कमिशन नेमून देवालये व मशिदींची वतने जप्त केली. त्यामुळे देवालयांची दुर्दशा झाली.

४) लॉर्ड कॅनिंग याची नेमणूक भारतीयांचे ख्रिस्तीकरण करण्यासाठी मुद्दाम करण्यात आली आहे अशी अफवा इ. स. १९५४ मध्ये पसरली.

५) ब्रिटिशांना इंग्रजी शिक्षण पद्धतीचा उपयोग ख्रिश्चन धर्मप्रसाराठीच करावयाचा आहे असा संशय भारतीयांना येत होता.

**४) लष्करी कारणे -**

लष्करातील भारतीय लोकांवर खालीलप्रमाणे अन्याय केला जात होता.

१) लष्करातील उच्च अधिकाराची पदे फक्त ब्रिटिशांनाच दिली जात होती.

२) एकाच स्तरावरील हिंदी व इंग्रज शिपायांच्या पगारात फारच तफावत होती. हमाल, मजूर यांच्यापेक्षाही हिंदी शिपायांना वेतन कमी होते.

३) लष्करातील हिंदी शिपायांना अत्यंत अपमानास्पद व अन्यायी वागणूक दिली जात असे. परेड ग्राऊंडवर त्यांना शिव्या दिल्या जात. प्रसंगी लाथा दिल्या जात.

४) हिंदी शिपायांने धर्मांतर करून ख्रिश्चन धर्म स्वीकारला की, त्याला लष्करात बढती मिळे. हा प्रकार हिंदी जनतेस संतापजनक वाटत होता.

५) लष्करी मोहिमेत इंग्रज अधिकारी प्रथम हिंदी शिपायांची फौज आघाडीवर धाडत. लढाई होऊन पहिल्या हल्ल्यात अनेक हिंदी शिपाई मारले गेले की मग गोरी फौज पुढे सरके. त्यामुळे मृत्यूच्या सापळ्यात हिंदी सैनिक व विजयाची माळ ब्रिटिश सैनिकांना. हा जो प्रकार होता तो संतापजनक होता.

६) १८९६ साली मद्रास आर्मीतील हिंदू शिपायांवर गंध न लावण्याची व दाढी न करण्याची सक्ती होती. १८२४ साली ब्रह्मी युद्धात बेंगॉल आर्मीतील हिंदू शिपायांवर समुद्रपर्यटनाची सक्ती करण्यात आली होती. जे शिपाई ब्रह्मदेशाच्या मोहिमेवर जाण्यास तयार नव्हते त्यांना कवायतीच्या मैदानावरच तोफेच्या तोंडी देण्यात आले, तर अनेकांना कैदेत टाकून त्यांच्यावर खटले भरण्यात आले. काही जणांना फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली. बराकपूरच्या छावणीत हा प्रकार घडला होता. विशेष

Scanned with OKEN Scanner

[illegible] २० वर्षानंतर १८५७ मध्ये बराकपूरच्या लष्करी छावणीत ब्रिटिश सत्तेविरुद्ध उठाव झाला होता. अफगाण युद्धात हिंदू लष्करावर अफगाणिस्तानात जाण्याची सक्ती करण्यात आली.

७) ब्रिटिशांची राजवट येण्यापूर्वी भारतातील अनेक लोकांना संस्थानिकांच्या लष्करातून नोकऱ्या मिळत. परंतु ब्रिटिशांनी संस्थानेच बरखास्त केल्याने त्यांच्याकडील सैनिकही बेकार झाले. ब्रिटिशांनी पंजाब प्रांत जिंकल्यानंतर त्या प्रांतातील शीख, पंजाबी व मुस्लिम लोकांनी लष्करी नोकरीचे त्यागपत्र दिले व बेकारी पत्करली.

८) भारतात एकूण हिंदी फौज २ लक्ष ३३,००० एवढी होती तर गोरी फौज ४५,००० होती. गोऱ्या फौजेच्या संख्येत वाढ करावी अशी सूचना लॉर्ड डलहौसीने केली होती. ब्रिटिशांकडे जी ४५,००० गोरी फौज होती त्यापैकी ४०,००० फौज एकट्या पंजाब प्रांतातच ठेवली होती. कारण या प्रांतात ब्रिटिश सत्तेविरुद्ध केव्हाही बंडाळी होईल अशी भीती ब्रिटिशांना वाटे. बिहार व बंगाल या दोन प्रांतांत दिनापूर व कलकत्ता येथेच ब्रिटिश फौज होती. भारतातील इतर ठिकाणी मात्र ब्रिटिश फौज फारशी नव्हती या बाबीची पूर्ण कल्पना भारतीय सैनिकांना होती. याचाच फायदा १८५७ च्या उठावात भारतीय सैनिकांना घेता आला.

**५) प्रशासकीय कारणे -**

१) प्रशासनव्यवस्थेतील उच्च अधिकाऱ्यांच्या जागा भारतीयांना मिळत नसत. त्यांना कमी पगाराच्या व कमी प्रतिष्ठेच्या जागा दिल्या. एक कारण वंशभेद व दुसरे कारण म्हणजे अशा जागेवर काम करण्यास ब्रिटिश व्यक्ती तयार होत नसत.

२) समान जागेवर काम करणारा भारतीय व ब्रिटिश माणूस यांच्या वेतनातही तफावत होती. ब्रिटिश कारकुनासही भरमसाठ पगार होते.

३) न्यायव्यवस्थेत भारतीयांना उच्च पदे दिली जात नसत. न्यायक्षेत्रातही गोरा-काळा हा वंशभेद पाळला जाई. युरोपियन लोकांना न्यायक्षेत्रात खास सवलती होत्या. युरोपियन गुन्हेगारांना भारतीय न्यायाधीश शिक्षा देऊ शकत नव्हता. त्यामुळे भारतीयांच्या मनात असंतोष निर्माण झाला होता.

४) इंग्रजी भाषेतून शिक्षण हे ब्रिटिशांनी १८३५ पासून सुरू केले. परंतु या शिक्षणास मुस्लिमांचा विरोध होता. ते या नव्या शिक्षणपद्धतीपासून दूर राहिले. इंग्रजी शिक्षण घेणारांनाच नोकरी देण्याचे ब्रिटिशांचे धोरण राहिल्याने प्रशासनापासून मुस्लिम वंचित राहिले. भारतावर १०००-१२०० वर्षे राज्य करणारी मुस्लिम जनता सत्ताही गमावून बसली व प्रशासनातही तिला स्थान नसल्याने ती ब्रिटिशांवर असंतुष्ट झाली.

५) फारशी, अरबी, उर्दू भाषेचे इ. प्रशासनातून उच्चाटन झाल्याने मुस्लिम

Scanned with OKEN Scanner

नाराज झाले. त्यांची प्रशासनातून हकालपट्टी होऊन बेकारी वाढली व त्याचा परिणाम मुस्लिमांच्या बेकारीत व पर्यायाने असंतोषात झाला.

**६) आर्थिक कारणे -**

ब्रिटिशांच्या राजवटीत भारतीयांचे विविध मार्गाने आर्थिक शोषण झाले होते.

१) ब्रिटिशांनी भारतातून कच्चा माल अत्यंत कमी किमतीत खरेदी केला व पक्का माल भारतीय बाजारपेठेत जास्त किमत लावून विकला. कारण भारत ही ब्रिटिशांची हक्काची बाजारपेठेत होती.

२) चहा -कॉफी, नीळ यांचे मळे, खाणी, विमा कंपन्या, कारखाने, लाकूडकटाई, या सर्वांच्या माध्यमातून ब्रिटिशांनी भारतीयांचे आर्थिक शोषण केले.

३) भारतात जे इंग्रज अधिकारपदावर होते त्यांचे पगार तेव्हाच्या वस्तूच्या किमतीच्या मानाने प्रचंड होते. या प्रचंड पगाराबद्धल म. फुले यांनीही त्यांच्या लिखाणात नाराजी व्यक्त केली होती.

४) ब्रिटिश साम्राज्याच्या संरक्षणासाठी हिंदी लष्कर सतत सुसज्ज ठेवले जाई. त्यामुळे लष्करावरचा खर्च वाढला होता. पण हा खर्च भारतीय लोकांवर लादला जाई. म्हणजे जे लष्कर आशिया-आफ्रिकेतील ब्रिटिशांच्या साम्राज्याचे संरक्षण करीत होते त्याचा खर्च मात्र भारतीयांवर लादला जाई.

५) ब्रिटिश राजवटीत लघुउद्योग व कुटीरोद्योग यांचा ऱ्हास होत गेला. त्यामुळे या उद्योगात जी माणसे होती ती बेकार झाली. दारिद्र्यात भर पडत गेली. बड्या उद्योगधंद्यात गुंतवणूक केल्यामुळे ब्रिटिश भांडवलदारांचा अमाप फायदा झाला. डॉ. ईश्वरीप्रसाद म्हणतात, "भारतमातेच्या दुधावर इंग्रज लठ्ठ झाले, परंतु भारतीयांवर मात्र उपासमारीची वेळ आली."

६) ब्रिटिशांनी भारतीयांवर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करही मोठ्या प्रमाणात लावले होते. इ. स. १८४० च्या ब्रिटिश पार्लमेंटच्या एका अहवालानुसार भारतात येणाऱ्या इंग्रजी मालावर सुती कापड ३.५ टक्के, गरम कापड २ टक्के एवढी जकात होती. परंतु भारतातून इंग्लंडमध्ये निर्यात होणाऱ्या सुती कापडावर १० टक्के, रेशमी कापडावर २० टक्के व उणी कापडावर ३० टक्के जकात घेतली जाई. याचा कापड उद्योगावर फार वाईट परिणाम होऊन या उद्योगातील कारागीर बेकार झाले होते.

७) ब्रिटिशांच्या कारकीर्दीत भारताची निर्यात कमी व आयात प्रचंड होती.

८) ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या राजवटीत शेती सुधारण्याचे फारसे प्रयत्न झाले नाहीत. केवळ जास्तीत जास्त महसूल गोळा करता येईल यावर कंपनी सरकारने आपले लक्ष केंद्रित केले होते. लॉर्ड कॉर्नवॉलीसची कायमधारा पद्धत ही शेतकऱ्यांना

Scanned with OKEN Scanner

अपायकारक ठरली होती. जमीनदार व सावकार यांच्याकडून शेतकऱ्याचे शोषण झाले पण ब्रिटिशांनी त्याची दखल घेतली नाही.

**७) तत्कालीन कारणे -** राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक व प्रशासकीय कारणांमुळे ब्रिटिशांच्याविरुद्ध उठावाची पार्श्वभूमी तयार झाली होती. आता फक्त ठिणगी पडण्याचीच गरज होती. बहादुरशहा, नानासाहेब पेशवे, झाशीची राणी, तात्या टोपे, कुवरसिंह वगैरे सर्व नेतेमंडळी कशा प्रकारे उठाव करावयाचा याबाबत ऐकमेकांशी चर्चा करीत असत. ब्रिटिशांची भारतातून हकालपट्टी करणे याबाबत त्यांचे एकमत झाले होते. लष्करी छावणीतूनही उठाव करण्यासंदर्भात हालचाली सुरू होत्या.

**१) काडतूस प्रकरण** - मार्च १८५७ ही तारीख उठावासाठी निश्चित करण्यात आली होती. एवढ्यात काडतूस प्रकरण उद्‌भवले. बंगालमधील बराकपूरच्या छावणीत अशी बातमी आली की, इंग्रजांनी सैनिकांना ज्या नवीन बंदुका दिल्या आहेत त्या बंदुकांच्या काडतुसांवर गाय, डुक्कराच्या मांसाची चरबी लावलेली असते.

गाय ही हिंदूंना पवित्र व डुक्कर मुसलमानांना निषिद्ध. तेव्हा लष्करातील हिंदू व मुसलमान शिपायांनी काडतुसे वापरण्यास नकार दिला. नकार देणाऱ्या शिपायांवर खटले भरून त्यांना १० वर्षांच्या शिक्षा ठोठावण्यात आल्या. त्यांना नोकरीतून काढून टाकण्यात आले. एवढेच नव्हे तर त्यांना तुरुंगात टाकण्यांत आले. या घटनेमुळे बंगालमधील सर्वच लष्करी छावण्यातून परिस्थिती स्फोटक बनत गेली.

**पंतप्रधान डिझरायलीच्या मते**, "चरबीयुक्त काडतुसे हे बंडाचे कारण नसून निमित्त होते. साम्राज्याचा-ऱ्हास आणि शेवट अशा काही कारणांमुळे होत नाही. बंडाचे मुख्य कारण म्हणजे गेल्या २-५ वर्षातील सुधारणा व त्यांची काटेकोरपणे केलेली अंमलबजावणी होय. डॉ. ईश्वरीप्रसाद यांच्या मते, "इंग्रजांनी काडतूस प्रकरणामुळे भारतीयांच्या धार्मिक भावना पायदळी तुडविल्या."

**२) मंगल पांडे याचे हौतात्म्य** - मंगल पांडे हा बराकपूरच्या चोवीसाव्या पलटणीतील एक सामान्य सैनिक होता. त्याने काडतूस वापरण्याबाबत सक्ती करणाऱ्या ब्रिटिश अधिकाऱ्याचा खून केला. त्यामुळे मंगल पांडेला पकडून एप्रिल १८५७ ला फाशी दिले गेले. तो या क्रांतियुद्धातील पहिला हुतात्मा होय. मंगल पांडेच्या फाशीचा वृत्तांत लष्करातील सर्व पलटणीत तसेच सर्वसाधारण जनतेपर्यंत पोहोचला तेव्हा सर्व देशातील लष्करी पलटणीत काडतुसांना स्पर्श न करण्याची एक लाटच उसळली. ३ मे रोजी लखनौ, ५ मे रोजी अयोध्या येथील आणि मीरतच्या घोडदलातील शिपायांनी जेव्हा काडतुसे वापरण्यास नकार दिला तेव्हा त्यांना १० वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा दिली गेली.

Scanned with OKEN Scanner